
ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME:II ISSUE XI July-Sept.2017



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor
**Dr. Sarkate Sadashiv**

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | भाषा आणि समाज | प्रा. डॉ. वैशाली सू. रोकडे | १ |
| २ | ग्रामिण साहित्यातील स्त्री लेखिका आणि स्त्रीवादी दृष्टिकोन | प्रा.डॉ. लक्ष्मण गीते | ४ |
| ३ | डॉ. विनायक तुमराम यांचे आदिवासी वैचारिक साहित्यातील महत्त्वपूर्ण योगदान | प्रा. डॉ. अनिल गर्जे,<br>श्री. रामचंद्र विठ्ठल माहोर | ६ |
| ४ | ग्रामीण साहित्य चळवळीचे भवितव्य | प्रा. शिवाजी सिरसाठ | ८ |
| ५ | संत चळवळ आणि संत भगवानबाबा | प्रा. कृष्णा उत्तम नागरे | १० |
| ६ | स्त्रीवाद संकल्पना, स्वरूप व उपयोजन | प्रा.डॉ. लक्ष्मण गीते | १४ |
| ७ | डॉ. विनायक तुमराम यांचे आदिवासी चरित्र वाङ्मयातील स्थान | प्रा. डॉ. अनिल गर्जे<br>श्री. रामचंद्र विठ्ठल माहोर | १७ |
| ८ | संत तुकारामांची अभंगवाणी | प्रा. रमेश बलभीम जाधवर | १९ |
| ९ | अस्मी एक आशयसंपन्न काव्यसंग्रह | प्रा. डॉ. सुर्यवंशी दिपक सुभाषराव | २२ |
| १० | डॉ. विनायक तुमराम यांनी आदिवासी कवितेला दिलेले विद्रोही रूप : एक अन्वयार्थ | प्रा. डॉ. अनिल गर्जे<br>श्री. रामचंद्र विठ्ठल माहोर | २६ |
| ११ | भारतीय संविधान आणि उपेक्षित अनुसूचित जमाती | प्रा. चांगदेव निवृत्ती मुंढे | २८ |
| १२ | केकाडी समाज - एक दृष्टिक्षेप | प्रा. समीर आबनावे | ३२ |
| १३ | भारतीय महिला अधिकाराचे उल्लंघन | प्रा. नवगणकर आर.व्ही. | ३४ |
| १४ | हुंडाविरोधी कायदा ! पण मानसिकतेचे काय ? | प्रा.डॉ. हेमंत सोनकांबळे | ३९ |
| १५ | बांगलादेश व सद्यास्थिती: एक आढावा | डॉ. दिनकर संतुकराव कळंबे | ४२ |
| १६ | भारतीय असंतोषाचे जनक : लोकमान्य टिळक | प्रा. डॉ. राजू वनारसे | ४५ |
| १७ | मराठवाड्यातील मतदारसंघ पुनर्रचित १५ व्या लोकसभा निवडणुकीचा अभ्यास : एक दृष्टिक्षेप | प्रा. डॉ. अवचार जी.आर | ५० |
| १८ | भारतीय राष्ट्रीय चळवळीत महिलांचा सहभाग | प्रा.डॉ.देशपांडे सुषमा पद्माकरराव | ५४ |
| १९ | भारतीय अंतर्गत सुरक्षा - समस्या नक्सलवाद और आतंकवाद | डॉ. भांगे चंद्रकांत बन्सीधर | ५६ |
| २० | हिन्दी की कालयजी कहानी 'गदल' में मानवीय मूल्य | डॉ. सुभाष जाधव | ६० |
| २१ | EFFECT OF NON LEGUMINOUS WEED MANURES ON GREEN LEAFY FODDER MAIZE CROP PRODUCTIVITY ANALYSIS OF TOTAL PLANT | Prakash N. Gholap | ६३ |
| २२ | १९६० नंतरची कविता : प्रवृत्ती आणि प्रवाह | प्रा.डॉ. राजशेखर नळगे | ६७ |
| २३ | आधुनिक काल मे कथासाहित्य की भूमिका | डॉ. सविता चोखोबा किर्ते | ७२ |
| २४ | मराठवाड्याची कृषी अर्थव्यवस्था आणि हवामान | प्रा.डॉ. गवारे एन.बी. | ७६ |
| २५ | महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्पाच्या पाण्याचे अर्थशास्त्र | प्रा.संजय मोतीराम दांदडे, | ७९ |



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

Power of Knowledge UGC Approved Journal Volume : II Issue XI July to Sept.2017 ISSN 2320- 4494

# १९६० नंतरची कविता : प्रवृत्ती आणि प्रवाह

प्रा.डॉ. राजशेखर नळगे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग
जवाहर कला,विज्ञान व वाणिजय महाविद्यालय, अणदूर

**प्रस्तावना -**

आधुनिक मराठी कविता आता सुमारे सव्वाशे वर्षाची झाली आहे. या दीर्घकाळात कवितेची भाषा, शैली, रचना आणि एकूणच गुणवैशिष्टयांमध्ये मूलभूत बदल होत गेल्याचे दिसते. कधी ती भावनीक हिंदोळयावर झुलली , तर कधी संज्ञात्मक म्हणजे केशवसुत्तांपासून ते अलिकडच्या ऐश्वर्य पाटकरपर्यंतच्य दीर्घ परंपरेत अनेक कवींचे लक्षणीय असे योगदान आहे. प्रत्येकानेच कवितेच्या प्रवाहाला वाहते ठेवले आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात केशवसुत, तर स्वातंत्र्योत्तर काळात मर्ढकर र युगप्रवर्तक कवी म्हणून नावाजले. या दोन टप्यातील या दोन्ही महत्वाच्या कवींच्या प्रभावाखाली तर कधी समांतर अशा रचना मराठीत होत राहिल्या. पण 1960 नंतर मात्र कवितेचे विविध प्रवाहच रूढ झाले. नियतकालिकांतल्या कवितेनेही आपली स्वतंत्र मुद्रा उमटवली, सामाजिक बांधिलकी आणि नव्या दृष्टीकोनाचा स्वीकार करून पारंपरिक मूल्यव्यवस्थेची चौकट तोडणारी कविताही याच काळात लिहिली गेली कवितेचा विस्तार झाला. अभिजनकेंद्री कविता बहुजनकेंद्री झाली.आशयसुत्रेही बदलत गेली. आणि त्यानंतर ख-या अर्थाने भाषिक आणि संरचनात्मक पातळीवर कविता बदलली. 1990 नंतर पाय रोवलेल्या जागतिकीकरणामुळे ग्रामीण आणि शहरी आशा दोन्ही पातळयांवर अस्वस्थता पेटली. यामुळे पुन्हा कवितेचा पारंपरिक रचनाबंध झुगारून काहीशी मुक्त स्वरूपाची कविता अभिव्यक्त होऊ लागली. सामाजिक स्तरावर उमटणारे सर्वच पडसाद कवितेतही उमटू लागले. समुहकेंद्री होत असतानाच ती अधिक आत्मनिष्ठ आणि व्यक्तिकेंद्री होत गेली. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कवींचे दृष्टिकोनच बदलत गेल्यामुळे कवितेतून व्यक्त होणा-या क्रिया-प्रतिक्रियांचे स्वरूप आणि जाणिवाही बदलत गेल्या. पारंपरिक रचनाबंध झुगारून नव्या पध्दतीने कविता लिहिणा-यांची एक पिढी मराठी कवितेत उदयाला आली.

**महानगरीय अस्तित्ववेदना व्यक्त करणारी कविता :-**

या शीर्षकाखाली ज्या कवींचा विचार अभिप्रेत आहे त्यातील बरेचसे कवी 1960 पासून काव्यलेखन करत आहेत.यात कोलटकर, चित्रे, नेमाडे, ओक, गुर्जर पासून वसंत अबाजी डहाके, रजनी परूळेकर , अशोक बागवे, विवेक मोहन राजापुरे इत्यादी अनेक नव्या कवींचा या समावेश होईल. यातील बसुसंख्य कवींच्या कवितांना महानगरीय संवेदनशीलतेबरोबर अस्तित्ववेदनेची एक उत्कट किनार आहे. महानगरीय जीवनाच्य धकाधकीत एकटा असहाय्य असुरक्षित असलेल माणूस हा कोलटकरांच्या कवितेचा विषय आहे.

चहुबाजूनी वाढणा-या आणि वेढणा-या अफाट भौतीक पसा-यात माणसाच्या माणूसपणाचीच कुचंबणा होत आहे. तो इतका अस्तित्वशून्य झाला आहे की, जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या प्रवासात त्याच्या हाती काहीही राहिले नाही. स्वत:च्या आयुष्याचा तो नाममात्र प्रेक्षक होऊन जातो. याचं उत्तम उदा. ' चरित्र ' ही कविता, यात प्रत्येक ठिकाणी जे घडलं त्याचा तो केवळ असहाय साक्षीदारच राहिला. या कवितेच एका सामान्य माणसाची ही चरित्रगाथा किती उपरोधिक पध्दतीने मांडली गेली आहे ते मुळातूनच पाहण्यासारखी आहे. " नाळेला गाठ मारून सुईण म्हणाली, पेढे आणा हो पेढे आणा " इथून त्याच्या जीवनप्रवासाला सुरूवात

झाली असून " अंगावर ट्रक घालून एकजण म्हणाला, दिखता नही मादरचोद दिखता नही" असा त्याचा शेवट होतो. कोलटकरांच्या या काव्यभाषेला खास बंबईच्या हिंदीची जोड आहे. त्यामुळे तेथील उपरोधाला आणखी विखारी तीव्रता आलेली दिसते.

याच महानगरीय अस्तित्ववेदनेचे आणखी एक उदा.म्हणजे दिलीप चित्रे यांच्या कवितेत पाहायला मिळते ती अशी

" हा पिता ही माता ही चिता हा जन्म

ही प्रेयसी हा समागम हे स्वर्गाचे चिन्ह " (स्वर्गाचे चिन्ह ) रतिभाव हे चित्रे यांच्या कवितेचे केंद्र झाले आहे. त्यांच्या अनेक कवितांतून शरीर प्रेमानुभावाची अनेक वर्णने येतात



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

. त्यांच्या कवितेबद्दल प्रकाश देशपांडे केजकर लिहितात. " ........... अशा रितीने प्रेमानुभाव, विश्वरूपानुभाव आणि मरणानुभाव यांच्यातील गुंतागुंतीच्या संबंधातून चित्र्यांची कविता साकार होते. ........ परंतू चित्र्यांच्या कवितेत अंतिमतेचा ठामपणा कोठेही दिसत नाही. उलट एक अनिश्चितता सर्वत्र जाणवते . ----- तसेच त्यांचा नकार कधी निर्णायक आणि प्रलयी होत नाही. यातच त्यांच्या कवितेची श्रेष्ठता आहे. "

सतीश काळसेकर यांच्या कवितेतही विकल मानवी अस्तित्वाला अर्थ देण्यासाठी देहनिष्ठ प्रणयाचाच आधार घेतलेला दिसतो . तर मनोहर ओक यांच्या कवितेतून महानगरीय जीवनातील बीभत्सता अविष्कृत होते. व्यसनाधीन लोकांचे आणि गुन्हेगारांचे ओंगळ, बीभत्स अधोविश्व त्यांच्या कवितेत अवतरते. ओकांची कविता म्हणजे माणसांच्या ओंगळ व्यवहारांनी बुजबुजलेल्या महानगरी संस्कृतीवरची एक वास्तवदर्शी कडवट प्रतिक्रियाच आहे. वसंत दत्तात्रय गुर्जर यांच्या कवितेत मात्र महानगरात जगणा-या मध्यमवर्गीय माणसांची अगतिकता शब्दरूप घेताना दिसते. त्यांच्या 'अरण्य' या कवितासंग्रहातून सामान्य मध्यमवर्गीय माणसांच्या जीवनाचे कारूण्य अभिव्यक्त झालेला दिसतो. यांच्या प्रमाणेच चंद्रकांत पाटील यांच्या कवितेतही मध्यमवर्गीय माणसांच्या जवीनाचीच परवड अधोरेखित होताना दिसते. या बरोबरच भ्रष्ट राजकारण, गतानुगतिक शिक्षणव्यवस्था यावरही त्यांची कविता भाष्य करताना दिसते.

भालचंद्र नेमाडे यांची कविता महानगरी संवेदनशीलतेतून जन्मली नसली तरी ती महानगरीय अस्तितवेदनेशी संवादी अशी आहे. " हे लांब लांब रस्ते कधी जुने होत नाहीत की बदलत नाहीत " या कवतेत कवी लिहितो.

"संध्याकाळी गावात फटका मारला कित्येक महिन्यांनी
हजार माणसं समोरून येऊन मागे गेली पण
एकही ओळखीचा नाही, ओळखीचे लोक दुस-या गावीच राहिले.
आता मीच कुणाच्या ओळखीचा नाही "

भीषण सामाजिक वास्तवाची दाहक जाणीव व्यक्त करणारा हा कवी त्याचवेळी त्याच्या अपरिहार्य स्वीकाराची जाणीवही व्यक्त करत राहतो.

प्राधान्याने महानगरीय जाणिवा व्यक्त करणा-या कवितेचा परामर्श घेतल्यानंतर वसंत आबाजी डहाळे यांच्या ' अस्तित्ववादी जाणिवा व्यक्त करणा-या कवितांचा विचार करावा लागेल. 'अस्तित्ववाद ' हा त्यांच्या कवितेत केंद्रस्थानी आहे. भोवतालच्या भीषण दहशतवादी वातावरणातले सामान्य माणसाचे भेदरलेले असुरक्षित जीवन हाच त्यांच्याही कवितेचा विषय आहे. तयांच्या शुभवर्तमान, योगभ्रष्ट या काव्यसंग्रहातील कवितांमधून हे प्रकर्षाने जाणवते.

नव्या पिढीतील नीळकंठ महाजन, अनिल द्रविड, विवेक मोहन, राजापुरे यांच्या कवितेतही महानगरी जीवन जगताना अनुभवाला येणा-या परात्मतेचीच चित्रणे येतात. तर वसंत पाटणकर, रजनी परूळेकर, गुरूनाथ धुरी, गुरूनाथ सामंत, विवेक मोहन राजापुरे यांच्या कवितेतूनही महानगरी संवेदनशीलता अभिव्यक्त होताना दिसते.

अशा प्रकारे महानगरीय अस्तित्ववेदना व्यक्त करणरी कविता ही 1960 नंतरच्या कवितेतील एक महत्त्वाचा प्रवाह आहे.

## दलित कविता : -

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यात मोठे भन्वंतर घडले अनेकविध साहित्यप्रवाह मोठया जोमाने पुढे आले. त्यांचे जल्लोषी स्वागतही झाले. हा पहिला वहिला जल्लोष हळूहळू स्थिरावाला व त्यांच्याविषयी गांभीर्याने चर्चा, समीक्षालेखन होऊ लागले. त्यापैकीच एक साहित्यप्रवाह म्हणजे 'दलित साहित्य ' होय.1960 नंतर उदयाला आलेल्या दलित साहित्याची मांड 1980 नंतर परिपक्व झालेली दिसते. प्रारंभीच्या ' दलित साहित्य आवर्तात सापडले आहे. '' दलित साहित्यात तोच तो पणा आलेला आहे. 'दलित साहित्य विचार आज प्रगल्भ झालेला दिसतो. दलित साहित्याच्या चळवळीस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे भक्कम पाठबळ मिळाले असून दलित दास्यामुक्तीच्या लढयात दलित कवी आणि साहित्यिक हिरीरीने
उतरला आहे. दलित साहित्याकांचा पहिला उद्‌गार कवितेच्या माध्यमातनू प्रकट झाला असून दिलत कविता ही शोषणमुक्तीच्या लढयातले एक महत्वाचे हत्यार आहे. असे मानले जाते. नामदेव ढसाळ आणि राजा ढाले यांच्या विद्रोही कवितेवर केशव मेश्राम, दया पवार , ज.वि.पवार . यशवंत मनोहर या दलित कवींची नवी पीढी पोसली गेली आणि तीही आपली अनुभवांची आणि शब्दांची मशाल घेऊन काव्यप्रांतात उतरली.

*Power of Knowlea*
त्यांच्या कवितेब
मरणानुभाव यांच्या
ठामपणा कोठेही दि
प्रलयी होत नाही. या
सतीश क
घेतलेला दिसतो .
लोकांचे आणि गुन्हे
व्यवहारांनी बुजबुज
कवितेत मात्र महान
कवितासंग्रहातून सा
पाटील यांच्या कवि
राजकारण, गतानुगा
भालचंद्र
संवादी अशी आहे.
"संध्याकाळी गावात
हजार माणसं समोर
एकही ओळखीचा
आता मीच कुणाच्या
भीषण स
जाणीवही व्यक्त कर
प्राधान्याने
अस्तित्ववादी जाणि
भोवतालच्या भीषण
आहे. तयांच्या शुभव
नव्या पिढ
जगताना अनुभवाल
सामंत, विवेक मोहन
अशा प्रक
आहे.
दलित कविता : -
स्वातंत्र्योत
जल्लोषी स्वागतही
होऊ लागले. त्यापैक
मांड 1980 नंतर प
पणा आलेला आहे
आंबेडकर यांच्या वि
हिरीरीने
उतरला आहे. द
शोषणमुक्तीच्या लढ
कवितेवर केशव मे
आपली अनुभवांची

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

. त्यांच्या कवितेबद्दल प्रकाश देशपांडे केजकर लिहितात. " ........... अशा रितीने प्रेमानुभाव, विश्वरूपानुभाव आणि मरणानुभाव यांच्यातील गुंतागुंतीच्या संबंधातून चित्र्यांची कविता साकार होते. ........ परंतू चित्र्यांच्या कवितेत अंतिमतेचा ठामपणा कोठेही दिसत नाही. उलट एक अनिश्चितता सर्वत्र जाणवते . ----- तसेच त्यांचा नकार कधी निर्णायक आणि प्रलयी होत नाही. यातच त्यांच्या कवितेची श्रेष्ठता आहे. "

सतीश काळसेकर यांच्या कवितेतही विकल मानवी अस्तित्वाला अर्थ देण्यासाठी देहनिष्ठ प्रणयाचाच आधार घेतलेला दिसतो . तर मनोहर ओक यांच्या कवितेतून महानगरीय जीवनातील बीभत्सता अविष्कृत होते. व्यसनाधीन लोकांचे आणि गुन्हेगारांचे ओगळ, बीभत्स अधोविश्व त्यांच्या कवितेत अवतरते. ओकांची कविता म्हणजे माणसांच्या ओंगळ व्यवहारांनी बुजबुजलेल्या महानगरी संस्कृतीवरची एक वास्तवदर्शी कडवट प्रतिक्रियाच आहे. वसंत दत्तात्रय गुर्जर यांच्या कवितेत मात्र महानगरात जगणा-या मध्यमवर्गीय माणसांची अगतिकता शब्दरूप घेताना दिसते. त्यांच्या 'अरण्य' या कवितासंग्रहातून सामान्य मध्यमवर्गीय माणसांच्या जीवनाचे कारूण्य अभिव्यक्त झालेला दिसतो. यांच्या प्रमाणेच चंद्रकांत पाटील यांच्या कवितेतही मध्यमवर्गीय माणसांच्या जवीनाचीच परवड अधोरेखित होताना दिसते. या बरोबरच भ्रष्ट राजकारण, गतानुगतिक शिक्षणव्यवस्था यावरही त्यांची कविता भाष्य करताना दिसते.

भालचंद्र नेमाडे यांची कविता महानगरी संवेदनशीलतेतून जन्मली नसली तरी ती महानगरीय अस्तितवेदनेशी संवादी अशी आहे. " हे लांब लांब रस्ते कधी जुने होत नाहीत की बदलत नाहीत " या कवतेत कवी लिहितो.

"संध्याकाळी गावात फटका मारला कित्येक महिन्यांनी
हजार माणसं समोरून येऊन मागे गेली पण
एकही ओळखीचा नाही, ओळखीचे लोक दुस-या गावीच राहिले.
आता मीच कुणाच्या ओळखीचा नाही "

भीषण सामाजिक वास्तवाची दाहक जाणीव व्यक्त करणारा हा कवी त्याचवेळी त्याच्या अपरिहार्य स्वीकाराची जाणीवही व्यक्त करत राहतो.

प्राधान्याने महानगरीय जाणिवा व्यक्त करणा-या कवितेचा परामर्श घेतल्यानंतर वसंत आबाजी डहाळे यांच्या ' अस्तित्ववादी जाणिवा व्यक्त करणा-या कवितांचा विचार करावा लागेल. 'अस्तित्ववाद ' हा त्यांच्या कवितेत केंद्रस्थानी आहे. भोवतालच्या भीषण दहशतवादी वातावरणातले सामान्य माणसाचे भेदरलेले असुरक्षित जीवन हाच त्यांच्याही कवितेचा विषय आहे. तयांच्या शुभवर्तमान, योगभ्रष्ट या काव्यसंग्रहातील कवितांमधून हे प्रकर्षाने जाणवते.

नव्या पिढीतील नीळकंठ महाजन, अनिल द्रविड, विवेक मोहन, राजापुरे यांच्या कवितेतही महानगरी जीवन जगताना अनुभवाला येणा-या परात्मतेचीच चित्रणे येतात. तर वसंत पाटणकर, रजनी परूळेकर, गुरूनाथ धुरी, गुरूनाथ सामंत, विवेक मोहन राजापुरे यांच्या कवितेतूनही महानगरी संवेदनशीलता अभिव्यक्त होताना दिसते.

अशा प्रकारे महानगरीय अस्तित्ववेदना व्यक्त करणरी कविता ही 1960 नंतरच्या कवितेतील एक महत्वाचा प्रवाह आहे.

**दलित कविता : -**

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यात मोठे भन्वंतर घडले अनेकविध साहित्यप्रवाह मोठया जोमाने पुढे आले. त्यांचे जल्लोषी स्वागतही झाले. हा पहिला वहिला जल्लोष हळूहळू स्थिरावाला व त्यांच्याविषयी गांभीर्याने चर्चा, समीक्षालेखन होऊ लागले. त्यापैकीच एक साहित्यप्रवाह म्हणजे 'दलित साहित्य ' होय.1960 नंतर उदयाला आलेल्या दलित साहित्याची मांड 1980 नंतर परिपक्व झालेली दिसते. प्रारंभीच्या ' दलित साहित्य आवर्तात सापडले आहे. '' दलित साहित्यात तोच तो पणा आलेला आहे. 'दलित साहित्य विचार आज प्रगल्भ झालेला दिसतो. दलित साहित्याच्या चळवळीस डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे भक्कम पाठबळ मिळाले असून दलित दास्यामुक्तीच्या लढयात दलित कवी आणि साहित्यिक हिरीरीने
उतरला आहे. दलित साहित्याकांचा पहिला उद्गार कवितेच्या माध्यामातनू प्रकट झाला असून दिलत कविता ही शोषणमुक्तीच्या लढयातले एक महत्वाचे हत्यार आहे. असे मानले जाते. नामदेव ढसाळ आणि राजा ढाले यांच्या बिद्रोही कवितेवर केशव मेश्राम, दया पवार , ज.वि.पवार , यशवंत मनोहर या दलित कवींची नवी पीढी पोसली गेली आणि तीही आपली अनुभवांची आणि शब्दांची मशाल घेऊन काव्यप्रांतात उतरली.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

करता. त्याच्या कवितेच्या आशयासाठी हे सारे त्याला आवश्यक वाटते. " हे विधान ब-याच विद्रोही कवींच्या बाबतीत लागू पडते.

'आजची मराठी कविता :- स्वरूप आणि समस्या' या लेखात दलित कवितेविषयी लिहिताना शांता शेळके म्हणतात, " ------- दलित कवितेने एक अगदी वेगळे अनुभवविश्व प्रथमच कवितेत आणले. दलित कवितेने एकूण मराठी कवितेच्या कक्षा विस्तारल्या, इतकेच नव्हे तर तिने या कवितेला एक वेगळे परिमाणही दिले.------- अगदी सुरूवातीला या कवितेने मराठीत खूपच खळबळ उडवून दिली. आत्मसंतुष्ट प्रस्थापिताना तिने गदागदा हलवून जागे केले. त्याच बरोबर सराईत समीक्षकांनाही तिने अस्वस्थ करून सोडले." अशा शब्दात भलावण केली असली तरी पुढे त्याची मर्यादाही त्यांनी दाखवून दिल्या आहेत.

नवोदित पिढीच्या विद्रोही कवीमध्ये माधव उहाळे, भगवान भोईर, सुरेंद्र नाईक, बाबूराव कांबळे, राम बसा खेत्रे. इत्यादी अनेक कवींचा समावेश होतो. विद्रोही कवितेच्या या प्रवाहात दलितेत्तर समाजात जन्मलेल्या कवींनीही विपूल काव्यनिर्मिती केली आहे.त्यांच्या कवितेतून व्यक्त होणा-या विद्रोही जाणिवा हाच एकनिकष येथे प्रमुख मानला आहे.

आज हा प्रवाह काहींसा जाणिवांच्या आवर्तात सापडलेला आणि म्हणूनच प्रभावाच्या दृष्टीने क्षीण झाल्यासारखा वाटत असला तरी त्यास आज इतर उपेक्षित समाजस्तरातील कवी येऊन मिळत आहेत. त्यांच्या जाणिवा आणि अनुभवविश्वामुळे हा प्रवाह उत्तरोत्तर समृद्ध होत जाईल अशी आशा वाटते.

**ग्रामीणी कविता :-**

स्वातंत्र्योत्तर काळातील इतर गद्य ग्रामीण साहित्यप्रमाणे कवितेनेही ग्रामजीनातील वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. ग्राम जीवन जगलेल्या भोगलेल्या कवींच्या अनुभूतींनी घेतलेले सहज शब्दरूप असे या कवितेचे स्वरूप आहे. 1960 मध्ये जेव्हा आनंद यादव यांचा 'हिरवे जग' हा कवितासंग्रह प्रकाशित झाला तेंव्हा ख-या अर्थाने ग्रामीण जीवनानुभूतीने रसरसलेली ग्रामीण कविता अवतरली असे असे म्हणता येईल. या कवितेला पूर्वपरंपरा नव्हतीच.

1960 ते 1967 या काळात राजा महान, सरोजनी बाबर, सदाशिव माळी, यांचे कवितासंग्रह प्रकाशित झाले. यांच्या कविता या जानपद गीतांचे संस्कार घेऊन आलेल्या दिसतात. या प्रवाहातच ना.धों.महानोर, विठ्ठल वाघ यांची कविता मात्र ग्रामीण अनुभवविश्व आणि स्वतंत्र अभिव्यक्ती पध्दती घेऊन अवतरलेली दिसते. विठ्ठल वाघ आणि शंकर बडे यांच्या कवितेत ग्रामीण बोलीचा बाज अभिव्यक्त जीवनानुभवाला अस्सलतेचे परिमाण प्राप्त करून देणारा ठरला असे म्हणता येईल. महानोरांची कविता मात्र नागर अभिरूचीला सुखविणा-या ग्रामीण रोमॅटिकतेकडे झुकलेली दिसते. सुधारक गायधानी यांनी आपल्या 'देवदूत' या चिंतनशील दीर्घकाव्यात सामान्य माणसांचे आणि शेतक-यांचे मूलभूत प्रश्न मांडले आहेत. गायमधानी यांची अलिकडच्या काळातील स्फूट कविता मात्र शेतक-यांचे यांनी ' आजून तर माण्सं होय ' ही कविता लिहून विधवा स्त्रियांची वेदनाच शब्दबध्द केली आहे, असे वाटत असले तरी ती एकूणच ग्रामीण स्त्रीच्या दु:खाचा दीर्घोद्गारच आहे असे म्हणता येईल.

ग्रामीण साहित्य गतीमान झाल्यानंतर 1980-81 च्या सुमारास ती संग्रहरूपाने पुढे येऊ लागली. ही कविता काव्यगुणानी कमी वाटत असली तरी तिच्यातून व्यक्त होणारी जाणीव नोंद घेण्यासारखी आहे, हे कवी ग्रामजीवनाविषयी आंधळया कौतूकाची भावना न बाळगता आशयाभिव्यक्तीचे सर्व संकेत बाजूला सारून हे सरळ जीवनानुभवाला भिडलेले दिसतात. सोपान हळमकर, मोहन पाटील, आबा गणपती, फ.म.शहाजिंदे आदी कवी नव्या जाणिवेने ग्रामीण काव्यलेखनाकडे वळलेले दिसतात. नारायण सुमंत, दा.र.दळवी, बाहरू सोनवणे, महेश केळूसकर, प्रतिमा इंगोले, इंद्रजित भालेराव यांना ग्रामीण साहित्य चळवळीने लेखनासाठी बळ पुरविले आहे असे दिसून येते.

नारायण सुमंत हा ग्रामीण जीवन चितारण्याच्या असोशीने झपाटलेला कवी आहे. त्यांची ' माढा: एक संदर्भ ' ही कविता दुष्काळातही शेतीवर अविचल निष्ठा ठेवणा-या शेतक-याची मानसिकता अभिव्यक्त करताना दिसते.

तो पोराला म्हणतो,

" लेकरा !
रेडयापाडयाची औत
थांबवू नगंस
धरनाचं पानी मागू नगंस
घेतला वसा टाकू नगसं !"

शंकर वाडेवाले यांची कविता मातीशी जखडलेल्या शेतकरी जीवनाचे सूचन करते. त्यांच्या सर्व कवितांतून एकच भाववृत्ती भरून राहिल्याने त्यांची संपूर्ण कवितासंग्रहच एक कविता असल्यासारखी वाटते. तयांच्या कवितेतील शेतकरी कर्ज, दलालांची कातरी, दुष्काळ यांच्या जोखडात अडकला आहे. या परिस्थितीला आपलं पूर्वजन्मींचं पापच कवितेविषयी स.रा.गाडगीळ म्हणतात, " निसर्गाच्या अवकृपेने उध्वस्त झालेल्या जीवनात मानवी निर्घृणतेची कृपा होताच शेतकरी कसा हवालदिल



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.

होतो याचेही चित्र कवी प्रत्ययकारी भाषेत रेखाटतो "

सोपान हाळमकर यांनी 'आक्रोश ' मध्ये ग्रामीण जीवनातील विफलता, दारिद्रय, शहरीकरणामुळे निर्माण होत चाललेली सामाजिक पडझड इत्यादी समस्या व्यक्त करताना दिसतो. शेतक-यांची दैन्यावस्था चित्रित करताना कवी म्हणतो,

" नगर ते नांदेडच्या बालाघाटच्या रांगेवर
वर्षातून एकदाच भरतात दाणे कणसावर
डोळे काढून पहा खिडकीतून प्रवासात
गाडया निघालेल्या,सडकेच्या दोन्ही बाजूंनी दिसतात
पाखरांचे जसे स्थलांतर होते, मोसम बदलताना
तशी गावेच्या गावे निघालेली, साखर कारखान्याना "

खेड्यांचे गळे घोटून शहरांची सूज वाढत चाललली आहे अशी खंत कवीची आहे. ' डोंगरद-यातील झाडानों, या कवितेत शहरीकरणाच्या प्रक्रियेत नागविला जाणारा ग्रामीण भाग कवीने चित्रित केला आहे. त्यांच्या कवितेला चिंतनशीलतेची बैठक आहे. त्यांनी आपल्या कवितेतून आशावादही व्यक्त केला आहे. ओसाड खेडी पाहून कवी म्हणतो,

"कणांच्या शोधात परागंदा झालेली पाखरे
पुन्हा आपले घरटे शोधत येतील
तेव्हा, तेव्हाच हे ओसाड गोकूळ होईल "

फ.म.शहजिंदे यांनी 'शेतकरी ' या चिंतनशील दीर्घ काव्यातून आणि इतर काही कवितांतून ग्रामीण वास्तवाचे चित्रण केले आहे. ते म्हणतात, " खेडयातला शेतकरी जसा आहे तसाच इथे शब्दात आहे. या त्यच्या आत्मोदगारात त्याच्या भावनाचा, विचारांचा, समाज-आपसमजांचा, श्रद्धांचा आणि एकूणच त्याचया कृषिबल संस्कृतीचा गुंता आहे.---------- मी केवळ भारवाही आहे "

पुंडलिक पाटील, ह.शि.खरात, रमाकांत जाधव, महेंद्र पाटील, चंद्रकुमार नळगे, उत्तम कोळगावकर, नीळकंठ महाजन, भास्कर बडे, सुर्यभान चव्हाण इत्यादी कवींनीही ग्रामीण कविता लिहिली आहे. पण हे कवी ग्रामजीवनाचा सूक्ष्म आणि समृद्ध अविष्कार घडवू शकले नाहीत.

उदयोन्मुख ग्रामीण कवितेची चाहूल दा.रा.दळवी, वाहरू सोनवणे, प्रतिमा इंगोले, इंद्रजित भालेराव, महेश कळसकर, प्रकाश धिनगावकर, वसंत पाटील, सदानंद देशमुख, महेंद्र पाटील, बाळ बावर यांच्या कवितेत लागते. दा.र.दळवी मालवणी बोलीतून, वाहरू सोनवणे भिलौरी बोलीतून काव्य लेखन करताना दिसतात. तर प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण स्त्री जीवनाचे दर्शन ' व-हाडी ' बोलीतून घडवलेले दिसते.

इंग्रजीत भालेराव हे आजच्या ग्रामीण कवितेतील लक्षणीय नाव आहे. त्यांच्या ' पीकपाणी ' मधून मराठवाड्याचे ग्रामजीवन मराठवाडयाच्या बोलीभाषेतून पहिल्यांदाच एवढय अस्सलपणे अविष्कृत झाले आहे असे म्हणता येईल. भालेरावांची कविता गावापेक्षा शेतात जास्त रमताना दिसते पण हे शेत गावापासून वेगळे करता येत नाही.

या खेरीज मधुकर धाकाराव, ललिता गादगे, कृष्णनाथ निकम, भारत सातपुते, महादेव तुपे, श्रीकांत देशमुख , बालमोहन आदलिंगे, रमेच चिल्ले , आ.य.पवार, पाटलोबा पाटील, जयराम खेडेकर अशा अनेक कवींचा उल्लेख करणे आवश्यक ठरेल.

अशाप्रकर आज शहरीकरणाच्या प्रक्रियेत एका प्रकारचे दुभंगलेपण अनुभवणारा तरीही मनात गावाकडची माती जपू पाहणारा, बदलत्या वास्तवाला धीटपणे सामोरा जाणारा ग्रामीण कवी आपल्या
अनुभवांशी प्रामाणिक राहून काव्यलेखन करीत आहे. आपल्या भोवतालच्या वास्तवाकडे तो डोळसपणे
पाहतो आहे. अनेक कवी ग्रामीण भागात राहून ग्रामजीवनाशी समरस होऊन काव्यलेखन करीत आहेत.

अशाप्रकारे 1960 नंतरच्या मराठी कवितेतील प्रवृत्ती प्रवाहाचा आढावा घेताना वरीलप्रमाणे महानगरीय अस्तित्ववेदना व्यक्त करणारी कविता, दलित कविता आणि ग्रामीण कवितेचा प्रामुख्याने येथे विचार केला गेला आहे.

**संदर्भ :-**


1) **प्रकाश देशपांडे केजकर** - मराठी कविता नवी वळणे
2) **नामदेव ढसाळ** - पुन्हा एकदा कविता ( संपा.महानोर )
3) **दुर्गा भागवत** - आस्वाद आणि आक्षेप
4) **विजय तेंडूलकर** - विद्रोही कविता * ( संपा. केशव भेणाम )
5) **शांता शेळके** - कविता-रती ( दिवाळी अंक 1992 )
6) **यशवंत मनोहर** - मराठी कविता आणि अधुनिकता
7) **नागनाथ कोत्तापल्ले** - आक्रोश ( सोपान हाळमकर )
8) **शांता शेळके** - कविता -रती (दिवाळी अंक 1992 )




Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Anadur, Tal. Tuljapur, Dist. Osmanabad.